# राग नाही, रोष नाही!

मोह नाही लोभ नाही!
राग नाही रोष नाही
व्हायचे जे, जाहले ते
त्याचा कुणा दोष नाही!

उरला मनात थोडा विषाद
अजाणपणे जे घडले प्रमाद
त्याचे आता लागले वेध
मना वाटतो त्याचा खेद
आता चुका करत नाही
राग नाही, रोष नाही!

घेत होतो, जुन्याचा शोध
तेव्हा झाला थोडासा बोध
झाले गेले, होऊन गेले
थोडे फार शिकवून गेले
मनात आता किंतु नाही
राग नाही, रोष नाही!
मोह नाही, लोभ नाही
आता काही उरले नाही!